25 JUL 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## कुलगुरू डॉ. शिर्के; शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत कार्यशाळा

# उलटसुलट चर्चा नको; अंमलबजावणी करा

कोल्हापूर, ता. २४ : 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे वास्तव आहे. त्याचे भान शिक्षण क्षेत्रातील घटकांनी बाळगले पाहिजे. आता येथून माघार नसल्याने याविषयी उलटसुलट चर्चा करू नये. त्याऐवजी विद्यार्थी या घटकास केंद्रबिंदू मानून त्यांना या धोरणाचे लाभ जास्तीत जास्त कशा पद्धतीने देता येऊ शकतील, यादृष्टीने विचार, कृती करण्याची ही वेळ आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीची तयारी करा', असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.



**कोल्हापूर : कार्यशाळेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले.**

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०च्या त्रैवार्षिक पूर्तीच्या निमित्ताने 'एनईपी-२०२० विक @ एसयूके' सप्ताहास प्रारंभ झाला. या निमित्ताने विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचालक, प्रतिनिधी यांच्यासाठी विशेष कार्यशाळा राजर्षी शाहू सभागृहात घेण्यात आली. त्यामध्ये ते बोलत होते.

### लवचिक मानसिकता निर्माण करा

■ 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण शिक्षणाच्या क्षेत्रात सकारात्मक बदलांचे वारे घेऊन आले आहे. शिक्षण क्षेत्रात कार्यरत सर्वच घटकांनी विद्यार्थ्यांना धोरणाचे दूरगामी लाभ मिळवून देण्यासाठी लवचिक मानसिकता निर्माण करून अंमलबजावणी केली पाहिजे', असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्रामध्ये आघाडी घेतली आहे. शासनाने अभ्यासक्रमाचा मसुदा तयार करण्यासाठी आपल्याला ३० सप्टेंबर पर्यंतची मुदत दिली आहे आणि ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत सर्व अनुषंगिक बाबींची पूर्तता करून तयार राहण्याचे निर्देश दिले आहेत. याचा अर्थ सन २०२४-२५ पासून धोरणाची अंमलबजावणी होणारच आहे. त्यामुळे त्यासाठी सर्वांनी तयारीत राहणे आवश्यक आहे. त्यासाठी सामोऱ्या आलेल्या बदलांना लवचिकतेने सामोरे जाणे, शैक्षणिक दर्जामध्ये कोठेही तडजोड न करणे, विद्यार्थी केंद्रबिंदू मानून त्याला या धोरणाचे पुरेपूर लाभ देण्याचे प्रयत्न करणे आणि एकमेकांशी सशक्त स्पर्धा करणे ही चतुःसूत्री अवलंबावी.'

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, 'उच्चशिक्षण संस्थांच्या संरचना व कार्यामध्ये मूलभूत स्वरुपाचे बदल नव्या धोरणामुळे येत आहेत. शिक्षण क्षेत्राला वेगवेगळ्या पद्धतीने अधिकाधिक स्वायत्तता देण्यात येत आहे. उच्च शिक्षणात सर्वोत्कृष्टता संपादित करण्यासाठी दर्जामध्ये कोठेही तडजोड करून चालणार नाही.'

या कार्यशाळेत मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, वाणिज्य व व्यावस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने अनुक्रमे गुणवत्तावर्धन व गुणवत्तापूर्ण शिक्षण याबाबत मार्गदर्शन केले. उपकुलसचिव विलास सोयम यांनी आभार मानले.

25 JUL 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आधुनिक हवामान संशोधनाला मिळणार बळ

## शिवाजी विद्यापीठाचा आयटीएमशी सामंजस्य करार

प्रतिनिधी
कोल्हापूर

केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपीकल मेट्रॉलॉजी (आय.आय.टी.एम.) संस्थेसोबत शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे हवामानविषयक आधुनिक संशोधनाला बळ मिळणार असुन दोन्ही संस्यांमध्ये संशोधनाच्यादृष्टीने आदानप्रदान होणार आहे.

आयआयटीएम ही देशातील एक प्रमुख वैज्ञानिक संशोधन संस्था आहे. ही संस्था हवामान आणि हवामान अंदाज सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या महासागरीय वातावरण प्रणालीच्या विविध पैलूंच्या अनुषंगाने संशोधनकार्य करत आहे. शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. द्रिगंबर शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला.

कराराच्या माध्यमातून विद्यापीठ परिसर व पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्र परिसरात वेदर स्टेशन बसवण्यात येणार आहेत. यामुळे वातावरणातील तापमान, पर्जन्य, आर्द्रता अशा विविध घटकांचे मोजमाप होणार आहे. ग्लोबल वॉर्मिंग, हवामानातील बदल, महापूर, दुष्काळ, दरडी कोसळणे आदी अनेक नैसर्गिक संकटाविषयी संशोधन केले जाणार आहे.

सामंजस्य करारावर आयआयटीएमचे संचालक डॉ. आर. कृष्णन व शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी सह्या केल्या. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, हवामान बदल व शाश्वतता अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर, शास्त्रज्ञ (जी) डॉ. एस. डी. पवार, शास्त्रज्ञ (एफ) डॉ. एम. एन. पाटील आणि डॉ. टी. धर्मराज, भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे डॉ. दादा पी. नाडे, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. अभिजीत पाटील व सुधीर पोवार उपस्थित होते.



**कोल्हापूर : केंद्रीय पृथ्वी मंत्रालयाच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपीकल मेट्रॉलॉजी संस्थेसमवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. पवार, डॉ. एम. एन. पाटील, डॉ. टी. धर्मराज, डॉ. सचिन पन्हाळकर उपस्थित होते.**

### हवामान बदलाच्या संशोधनाला बळ देणारा करार

या करारामुळे हवामान बदलाच्या अधुनिक संशोधनावर गांभीर्यपूर्वक लक्ष केंद्रित केले आहे. हवामान बदलाबाबत निर्धारित केलेली शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कराराचा उपयोग होणार आहे. दोन्ही संस्थांमध्ये संशोधन व आदानप्रदानामुळे संशोधनाला बळ मिळणार आहे. विद्यापीठातील विद्यार्थ्यांना संशोधनासाठी फायदा होईल.

**– डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाचे देणगीदार धनंजय दिगे यांचा सत्कार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केला. यावेळी शेजारी विजय ककडे, जयदेव दिगे उपस्थित होते.

# भगवान महावीर अध्यासनाला धनंजय दिगे यांच्याकडून देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीसाठी शाहूपुरीतील धनंजय बंडोबा दिगे यांनी ५० हजारांची देणगी दिली. त्यांनी देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. धनंजय दिगे यांच्या जीवनावर समंतभद्र महाराज तसेच विद्यानंद महाराज यांच्या पवित्र सानिध्याचा आणि आशीर्वाद प्रभाव आहे. वडगाव हायस्कूल व बाहुबली हायस्कूलमधून त्यांचे शिक्षण झाले. जैन बोर्डिंगमध्ये ते कार्यरत होते. वयाची ८३ वर्षांनंतरही उत्तम आरोग्य हे जैन धर्माच्या काटेकोर आचरणातून मिळाल्याचे त्यांनी सांगितले. कुलगुरू डॉ. शिर्के यांचे मित्र या नात्याने त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. दिगे यांचा सत्कार कुलगुरू डॉ. शिर्के यांनी शाल, विद्यापीठ बोधचिन्ह, ग्रंथ देऊन केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले, प्रा. डॉ. विजय ककडे, जयदेव दिगे उपस्थित होते.

तरुण भारत

# 'नागरी सहकारी बँकांचे समाजातील स्थान महत्वाचे'

प्रतिनिधी
कोल्हापूर

नागरी सहकारी बँकांचे समाजातील स्थान महत्त्वाचे आहे व त्यांनी स्पर्धात्मक युगात कायम अग्रेसर राहण्यासाठी आधुनिकतेची कास धरली पाहिजे, असे प्रतिपादन डॉ श्रीकृष्ण महाजन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठामध्ये दोन दिवसीय मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रॅमच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाच्या गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र व कोल्हापूर नागरी सहकारी बँक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नागरी सहकारी बँकांच्या शाखाधिकाऱ्यांसाठी या कार्यक्रमाचे आयोजिन केले होते. 'कॅपॅसिटी बिल्डिंग प्रोग्रॅम फॉर मॅनेजर्स ऑफ अर्बन को ऑपरेटिव्ह बँक्स ऑफ कोल्हापूर डिस्ट्रिक्ट' या दोन दिवसीय मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रॅमला सुरुवात झाली. नागरी सहकारी बँकांच्या शाखाधिकाऱ्यांना स्पर्धात्मक युगात स्वतः च्या बँकांना सक्षमतेने पुढे नेण्यासाठी विद्यापीठाने या विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

डॉ. महाजन यांनी भारतीय अर्थव्यवस्थेचा उहापोह करताना नागरी सहकारी बँकांचे या अर्थव्यवस्थेतील स्थान व त्यांची गरज याची व्यवस्थापकीय दृष्टिकोनातून मांडणी केली. पहिल्या सत्रात कुंभी कासारी सहकारी बँकेचे सीईओ दत्तात्रय राऊत यांनी नेतृत्व गुण व आरबीआयच्या विविध मापदंडांसंदर्भात उत्कृष्ट मांडणी केली. दुसऱ्या सत्रामध्ये विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया चेअरचे प्रोफेसर डॉ. राजन पडवळ यांनी मार्गदर्शन केले.

डॉ राजन पडवळ, आजरा अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत गंभीर, पंचगंगा सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी। अधिकारी दीपक फडणीस, सायबरच्या कौन्सिलर उर्मिला चव्हाण व अपना बँकेच्या अधिकारी राणी काशीकर यांनी मार्गदर्शन केले.

25 JUL 2023
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाकडून ५६५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत आजअखेर आजअखेर ५६५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ फार्मसी, मास्टर ऑफ आर्टस्, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे झाल्या., परीक्षेसाठी २ हजार ८६७ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, पीजी डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी, हेल्थ अँड एन्व्हायर्मेंट या अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत.

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा विविध महाविद्यालयांत सोमवारी पार पडल्या. वर्णनात्मक पद्धतीने एकूण ५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्यात आल्या. या परीक्षांसाठी २ हजार ८६७ विद्यार्थी उपस्थित होते, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक अजितसिंह जाधव यांनी दिली. दिवसभरात परीक्षा विभागातर्फे २ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. आतापर्यंत एकूण ५६५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत.

तरुण भारत

# विद्यापीठातर्फे ५६५ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सोमवारी २ हजार ८६७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ आर्टस्, बॅचलर ऑफ फार्मसी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन या विषयांचा समावेश आहे. या परीक्षेसाठी अडचण येवू नये म्हणून काही विषयांच्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र असलेल्या महाविद्यालयातील वसतिगृहात राहण्याची व्यवस्था केली आहे. सोमवारी कोणताही गैरप्रकार सापडला नाही. आतापर्यंत ५६५ परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

25 JUL 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरी गुळाचा नैसर्गिक गोडवा जपणारे संशोधन विद्यापीठात!

## प्रा. डॉ. ज्योती जाधव-बाटे यांचा गूळ संशोधनासाठीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर आणि गूळ हे नाते काही नवीन नाही. गुळाची ओळख अढळ, अखंड ठेवण्यासाठी शिवाजी विद्यापीठात एक महत्त्वपूर्ण संशोधन सुरू झाले आहे. संशोधनामुळे गूळ कुठल्या प्रतीचा आहे हे त्याच्यातील मूलद्रव्यांचे प्रमाण, नैसर्गिक सुगंधी घटक व रंगावरून ठरवता येणार आहे. यामुळे साखरमिश्रित गुळाला आळा बसेलच, शिवाय ग्राहकांना चांगला गूळ व गुळाला योग्य भाव मिळू शकेल.

शिवाजी विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागांतर्गत गूळ व त्याच्याशी निगडित सर्व उपपदार्थांवर महत्त्वपूर्ण संशोधन सुरू आहे. संशोधनाची दखल भारत सरकारच्या अन्न व सुरक्षा विभागाने घेतली आहे. जैवतंत्रज्ञान अधिविभागास जानेवारी २०२० मध्ये महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान केंद्राच्या संशोधन समितीकडून प्रा. डॉ. ज्योती जाधव-बाटे यांना गूळ संशोधनासाठीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मिळाला आहे. तेव्हापासून गुळाबद्दल वैज्ञानिक, सामाजिक उपाययोजनाच्या दृष्टीने अभ्यास सुरू झाला आहे. सध्या कोल्हापुरी गुळाच्या नावाखाली सर्वत्र गूळ विकला जातो, पण पॅकबंद असलेला गूळ हा खरंच कोल्हापुरी आहे का? व असेल तर तो शुद्ध स्वरूपातील आहे का? हाच वैशिष्ट्यपूर्ण अभ्यास प्रकल्पांतर्गत करण्यात येत आहे. सामाजिक दायित्वाच्या भावनेची जोड संशोधनास लाभली आहे.



शिवाजी विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान अधिविभागातील प्रयोगशाळेत तयार केलेले गुळाचे विविध प्रकार.

### प्रकल्पामुळे या गोष्टी साध्य होतील...

कोल्हापुरी गुळाची हरवलेली ओळख परत आणण्यासाठी मदत होईल. साखरमिश्रित गूळ व नैसर्गिक शुद्ध स्वरूपातील गूळ स्वतंत्रपणे ओळखता येऊ शकेल किंवा त्याची वर्गवारी करता येईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे काळा गूळ म्हणजेच सेंद्रिय गूळ हा गैरसमज दूर होईल. ग्राहकांना उच्च दर्जाच्या गुळाची संकल्पना समजू लागेल. शिवाजी विद्यापीठास गूळ, अन्न संशोधनासाठीची स्वतंत्र 'एनएबीएल' मानांकन असलेली प्रयोगशाळा मिळेल. त्यामुळे, कोल्हापुरी गुळावर सखोल अभ्यास होईल. पुढील काळात उत्तम आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजारपेठ कोल्हापुरी गुळासाठी उपलब्ध होईल.

**असा असेल प्रकल्प...**

२०२० मध्ये सुरू झालेल्या प्रकल्पात शिवाजी विद्यापीठासोबत भारतीय प्रौद्योगिकी संस्था (आयआयटी),, मुंबई, रासायनिक तंत्रज्ञान संस्था, मुंबई (आयसीटी, मुंबई) व राजर्षी शाहू गूळ संशोधन संस्था, कोल्हापूर (आरएसजेआरएस) यांचा समावेश आहे. सर्वच संस्थांना गुळासंबंधी शास्त्रशुद्ध अभ्यास करण्यास सांगितला आहे. विद्यापीठाकडे गुळाच्या नमुन्यांच्या पृथक्करणापासून ते विश्लेषणापर्यंतची जबाबदारी सोपविण्यात आली. हा प्रकल्प तीन टप्प्यांत पूर्ण करण्यात येणार आहे.

पहिला टप्पा कोल्हापुरातील विविध भागांत जाऊन तिथून माती, पाणी, ऊस व त्याच्यापासून बनवलेल्या गूळ यांचा अभ्यास करण्यात आला. दुसऱ्या टप्प्यात कोल्हापुरातील दीडशेपेक्षा अधिक ठिकाणांवर जाऊन तेथून ऊस मिळवून त्याचा प्रयोगशाळेत शास्त्रीय पद्धतीने गूळ बनविण्यात आला, त्याची वैशिष्ट्ये अभ्यासली गेली. तिसऱ्या टप्प्यात अन्य पद्धतीने बनवलेला गूळ आणि शुद्ध नैसर्गिक पद्धतीने केलेला गूळ यांच्यातील तफावत समजून घेण्यात आली.

**गुळावरील संशोधनाची गरज का?**

१२ ते १५ महिने पूर्ण असलेला व २० ते २५ टक्के शुद्ध स्वरूपातील साखर असलेला असा उत्कृष्ट दर्जाचा ऊस गूळ बनविण्यासाठी घेतला जातो. त्याच्यापासून रस काढून त्याचा सामू समतोल केला जातो. त्यानंतर त्यातील मळी बाजूला केली जाते आणि रस गरम करत करत शेवटी गूळ बनतो. तथापि, बाजाराची वाढती गरज व गुळाला मिळणारा एकूण भाव लक्षात घेता यात बराच फरक पडलेला दिसतो.

**कसा होतो निकृष्ट दर्जाचा गूळ?**

अपरिपक्व उसापासून किंवा रोपवाटिकेतील शिल्लक राहिलेला ऊस आणला जातो आणि त्यापासून गूळ बनविला जातो. अशा निकृष्ट दर्जाच्या उसापासून गूळ बनवला तर तो निकृष्ट असतो. हेच शास्त्रीयदृष्ट्या समजावून घेण्याचे काम जैवतंत्रज्ञान अधिविभागातील संशोधक करीत आहेत. उदाहरणार्थ, शुद्ध नैसर्गिक पद्धतीने बनविलेल्या गुळामध्ये लोहाचे प्रमाण साधारणतः ५० ते १०० मिलीग्रॅम प्रतिकिलो असते. पण इतर गुळांमध्ये हेच लोहाचे प्रमाण १० ते १५ मिलीग्रॅम प्रतिकिलो आढळले. अशा बऱ्याच बाबींची तपासणी प्रायोगिकदृष्ट्या प्रकल्पांतर्गत करण्यात आली.

संशोधनातील निष्कर्ष वेळोवेळी राजीव गांधी विज्ञान तंत्रज्ञान केंद्राच्या तज्ज्ञ समितीसमोर जैवतंत्रज्ञान अधिविभागामार्फत डॉ. ज्योती जाधव-बाटे, डॉ. अण्णासाहेब गुरव, डॉ. ओंकार अपिने, डॉ. संतोष सुतार, सुमित परीट, विक्रमसिंह कानुगडे, डॉ. मनाली राणे यांनी सादर केले. समितीची अखेरची बैठक २५ एप्रिल रोजी झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, पद्मभूषण डॉ. जी. बी. जोशी, डॉ. ए. ए. सप्रे, डॉ. नचिकेत कोठवालीवा (लुधियाना), डॉ. व्ही. एम. नाईक, डॉ. नरेंद्र शहा, डॉ. ए. बी. पंडित, डॉ. विलास श्रीहट्टी, वाय. बारामतीकर, डॉ. जी. जी. सोहनी, डॉ. रेखा सिंघल, डॉ. एस. गोरंटीवार, डॉ. संजय महाजनी व प्रबोध गडकरी यांच्या उपस्थितीत संशोधनाविषयी चर्चा व सादरीकरण झाले. विद्यापीठातील संशोधन भारत सरकारच्या अन्न व सुरक्षा विभागाकडे पाठवले असून त्यांनी याची सकारात्मक दखल घेतली आहे.